डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

ऐक्य
९२ वर्षांची वाचनीय परंपरा
: www.dainikaikya.com सातारा गुरुवार दि. २९/९/२०१६ email : news@dainikaik

# कोरेगाव येथील डी. पी. भोसले कॉलेजमध्ये शनिवारपासून जिल्हास्तरीय युवा महोत्सव

कोरेगाव, दि. २८ : रयत शिक्षण संस्थेच्या येथील डी. पी. भोसले कॉलेजमध्ये शिवाजी विद्यापीठांतर्गत ३६ वा सातारा जिल्हास्तरीय युवा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

महोत्सवामध्ये जिल्ह्यातील ७५ महाविद्यालये सहभागी होणार आहेत. विविध मान्यवरांच्या उपस्थितीत या महोत्सवाचे उद्‌घाटन होणार आहे. त्यासाठीची तयारी पूर्ण झाली आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे हे महोत्सवादरम्यान भेट देणार आहेत, अशी माहिती प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनी दिली.

संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य आ. डॉ. पतंगराव कदम यांच्या हस्ते व चेअरमन डॉ. अनिल पाटील यांच्या अध्यक्षतेखाली महोत्सवाचे उदघाटन होणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाचे प्रमुख प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांच्यासह विद्यापीठ, विविध संस्थांचे पदाधिकारी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.